# ‘भारतातील स्त्रीवादी साहित्य हे तर सर्जनशीलतेचीच वैविध्यपूर्ण अभिव्यक्ती’

म. टा. विशेष प्रतिनिधी, नवी दिल्ली

## ओडिशी लेखिका प्रतिभा रे यांचे प्रतिपादन

‘स्त्रीवादी साहित्य ही सर्जनशीलतेची वैविध्यपूर्ण अभिव्यक्ती आहे,’ असे विचार ओडिशी लेखिका प्रतिभा रे यांनी येथे व्यक्त केले. साहित्य अकादमी आणि राष्ट्रपती भवन सांस्कृतिक केंद्रातर्फे झालेल्या साहित्योत्सवाचा समारोप मोठ्या उत्साहात झाला. त्यावेळी त्या बोलत होत्या. राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त हिमांशू वाजपेयी आणि प्रज्ञा शर्मा यांनी सादर केलेल्या ‘गाथा अहिल्याबाईंची’ या कार्यक्रमाला उपस्थितांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

साहित्य अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक, सचिव डॉ. के. श्रीनिवास राव, उपाध्यक्षा कुमुद शर्मा आदींच्या उपस्थितीत या साहित्य सोहळ्याच्या दुसऱ्या दिवशी ‘किती बदललेय साहित्य ?’ या विषयावर तीन चर्चासत्रे झाली. ‘भारतातील स्त्रीवादी साहित्य: नवीन पाया’ या सत्राचे अध्यक्षपद भूषवताना ओडिशी लेखिका प्रतिभा रे यांनी, स्त्रीवादी साहित्य हे वेगळे अस्तित्व नसून सर्जनशीलतेची वैविध्यपूर्ण अभिव्यक्ती आहे यावर भर दिला. १५व्या शतकातील ओडिया कवी बलराम दास यांच्या लक्ष्मी पुराणाचा संदर्भ देत, त्यांनी भारतात स्त्रीवादी साहित्याचा पाया रचण्याचे श्रेय त्यांना दिले. अनामिका, प्रीती शेणॉय, अनुजा चंद्रमौली, खासदार महुआ माझी, पत्रकार निधी कुलपती, आणि विख्यात तमिळ साहित्यिका थंगापांडियन यांनीही विचार मांडले.

भारतीय स्त्रीवादी साहित्य सीमा ओलांडत आहे आणि नातेसंबंधांची पुनर्परिभाषा करत आहे, असे मत अनामिका यांनी मांडले. खासदार माझी यांनी स्त्रीवादाच्या प्रमुख पैलूंवर प्रकाश टाकताना हिंदी साहित्यातील महिला अभिव्यक्तीवादी आणि सर्जनशील लेखनाचा आढावा घेतला.

‘साहित्यातील बदल विरुद्ध बदलाचे साहित्य’ या सत्राच्या अध्यक्षपदावरून बोलताना कुमुद शर्मा म्हणाल्या की, साहित्याच्या अनुवादातूनच आपल्याला अनेक बदल स्पष्ट होतात. गिरीश्वर मिश्रा म्हणाले की, साहित्य नेहमीच त्याच्या काळातील वास्तव त्याच्या बदलांसह व्यक्त करते. यतिंद्र मिश्रा म्हणाले की, साहित्यात आधुनिकतेचा प्रश्न अनेकदा उपस्थित केला जातो जणू काही लेखन किंवा सर्जनशील कार्य आधुनिक नसल्यास त्याचे कोणतेही मूल्य नाही.




**राष्ट्रपती भवनात आयोजित साहित्योत्सवाच्या समारोप प्रसंगी राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त ‘गाथा अहिल्याबाईंची’ कार्यक्रम सादर करताना’ हिमांशू वाजपेयी आणि प्रज्ञा शर्मा.**

### नवीन साहित्याकडे उपस्थितांचे वेधले लक्ष

‘जागतिक दृष्टिकोनातून भारतीय साहित्याच्या नवीन दिशानिर्देश’ या विषयावरील चौथ्या चर्चासत्राचे अध्यक्षपद अभय मौर्य यांनी भूषवले. आजच्या काळात कृत्रिम प्रज्ञेने (एआय) चिन्हांकित केलेल्या इलेक्ट्रॉनिक क्रांतीच्या प्रभावाखाली भारतीय साहित्यात विषय आणि शैलीच्या बाबतीत उदयास येत असलेल्या नवीन साहित्याकडे वक्त्यांनी लक्ष वेधले.